स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-६ मे, २०२३

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविले जातात त्या महाविद्यालयांमध्ये प्रत्येक विषयांसाठी कमीतकमी दोन नियमित शिक्षकांची नियुक्ती बंधनकारक करण्याचा निर्णय विद्यापरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

विद्यापरिषदेची सभा विद्यापीठाच्या अधिसभागृहात कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील उपस्थित होते. या बैठकीत विविध ४८ विषयांवर चर्चा झाली. पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.एस्सी./एम.कॉम./एम.ए./एल.एल.एम./एम.एस.डब्ल्यू.) राबविणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ मान्य ४१५(१) नुसार कमीतकमी प्रत्येक विषयांसाठी दोन शिक्षकांची किंवा ५०% शिक्षकांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्याच्या विषयावर बैठकीत चर्चा झाली. अनेक महाविद्यालयांमध्ये या प्रकारची शिक्षकांची नियुक्ती केली नसल्याचे दिसून येते. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी प्राध्यापक मिळत नाही आणि निकालाला उशीर होतो. पर्यायाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. त्यामुळे येत्या नव्या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयांमध्ये दोन शिक्षकांची किंवा ५०% शिक्षकांची नियुक्ती बंधनकारक राहील असे कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांनी स्पष्ट केले. हा ठराव विद्या परिषदेने एकमताने मंजुर केला.

विद्यापीठाच्या प्रशाळांमध्ये एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, एम.ए.भूगोल, एम.एस्सी. मॅथेमॅटीक्स, एम.एङ आणि बी.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी इंग्रजी सोबतच मराठी भाषेतूनही शिक्षण देण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला. उच्च शिक्षण क्षेत्रातील शिखर संस्थांनी स्थानिक मातृभाषेत विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जावे असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने कुलगुरु प्रा. माहेश्वरी यांनी प्रा.सतीश कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली दुहेरी भाषेतून विद्यापीठ प्रशाळांमध्ये शिक्षण देण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यासाठी समिती नेमली होती. त्यानुसार विद्यापीठ प्रशाळांमधील वरील अभ्यासक्रमांसाठी आता इंग्रजी सोबतच मराठीतूनही विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाणार आहे. क्रमिक पुस्तके मराठीत तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. दुहेरी भाषेतून शिक्षण देण्यासाठी त्या त्या अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या एकूण जागांच्या २०% जागांवर विद्यार्थ्यांना येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश दिला जाणार आहे.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स आणि सामाजिकशास्त्र प्रशाळेत बी.ए. अर्थशास्त्र हे चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठातील शिक्षणशास्त्र प्रशाळेचे नाव बदलून आंतर विद्याशाखीय अभ्यास प्रशाळा असे करण्यासही मान्यता देण्यात आली. विद्यापीठाच्या बहि:स्थ विभागाव्दारे विविध अभ्यासक्रम राबविले जातात. आता या विभागाव्दारे सुरु असलेली शैक्षणिक व प्रशासकीय कार्यप्रणाली ही आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत विलीन करण्यास देखील या बैठकीत विद्या परिषदेने मान्यता दिली. याशिवाय बैठकीत नवीन शैक्षणिक धोरणावर सदस्यांनी चर्चा केली. कुलगुरु

प्रा. माहेश्वरी यांनी बैठकीच्या प्रारंभी मार्गदर्शन करतांना विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सर्व सदस्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

विविध विषयांवरील चर्चेत अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस.राजपूत, प्राचार्य अशोक खैरनार, प्रा.एस.टी.भूकन, प्राचार्य अरविंद चौधरी, प्राचार्य मिलिंद बिल्दीकर, प्राचार्य गौरी राणे, डॉ.शिल्पा बेंडाळे, डॉ.केतन नारखेडे, डॉ.राहुल कुलकर्णी, प्रा.संजयकुमार शर्मा, प्रा.भूपेंद्र केसूर, प्रा.प्रशांत देशमुख, डॉ.एस.आर.सुरळकर, डॉ.गुणवंत सोनवणे आदींनी सहभाग घेतला.

---------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी